# पर्यावरण रक्षणाकरिता आपल्या कृतीची आवश्यकता




पश्चिम घाट अर्थात आपला  सह्याद्री, भारताच्या पश्चिम किनारपट्टीला लागून दक्षिणोत्तर पसरला आहे. सह्याद्रीचा हा  भाग कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ आणि तामिळनाडू या राज्यात आहे. त्यातच आपण गेली कित्येक शतके राहत आहोत. उच्च दर्जाची जैवविविधता असलेल्या या परिसरात आपण राहतो त्याचा सार्थ अभिमान असला पाहिजे. येथे आढळणाऱ्या दुर्मिळ वनस्पतींच्या आणि प्राण्यांच्या जाती टिकवून ठेऊन पुढील पिढीला हस्तांतरित करणे अत्यंत गरजेचे आहे. याच भागात विकासाच्या नावाखाली अनेक खाणी सुरु आहेत. ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ माधव गाडगीळ आणि सहकारी यांनी पश्चिम घाट बचाव समितीच्या माध्यमातून बनवलेल्या अहवालाला सरकारने केराची टोपली दाखवण्याचा प्रयत्न जरी केला असला तरी युनेस्कोने याच पश्चिम घाटातील पर्यावरण दृष्ट्या संवेदनाशील असलेल्या ३९ जागांना जागतिक वारशाचा दर्जा दिला आहे. या निर्णयामुळे या ठिकाणी पर्यावरणास हानिकारक असलेले विकास प्रकल्प सरकारला राबवता येणार नाहीतआणि त्या संबंधित अहवाल वेळोवेळी जागतिक पातळीवर जाहीर करावे लागतील.

पश्चिम घाटात खडकांत जमिनीतील खोलगटीत दडलेले साप, बेडूक, सरडे वा कपारीतील वटवाघळे हे प्राणीसुद्धा निसर्गाचा भाग आहेत, त्यांना त्यांची जीवनप्रणाली आहे आणि त्यांचे ते छोटेखानी जीवनदेखील या विशाल जीवसृष्टीचे चक्र चालू राहण्यासाठी महत्त्वाचे आहे.अनेक अल्पजीवी आणि भक्कम खोड नसलेल्या वनस्पती आहेत इथले  सडे, खडकाळ पठारे,तीव्र उतार  म्हणजे निरुपयोगी जागा नव्हेत. इथल्या पठारांवर बाहेरून माती टाकून

आंब्याची झाडे लावली जातात. पवनचक्क्या उभ्या केल्या जातात.असा खडकाळ भूभाग कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत समुद्रकाठी आहे. खडकाळ पठारी भागाला 'सडा' म्हणतात. सडे म्हणजे तेथील टेबललँड. गोव्याच्या रस्त्यावर कॅसलरॉक, अनमोडचा घाट, तिलारी घाट, कोल्हापूरजवळ मसाई पठार, आंबाघाट, बरकीचे पठार,कराडजवळील वाल्मिकीचे पठार,पाचगणीचा टेबल लँड असे कितीतरी भाग दिसतात. त्या सर्व ठिकाणी लोकांनी तेथे फिरत असताना, पावसाळा सोडून अन्य वेळी तपकिरी शुष्क कोरडे खडक आणि सडे, पाहिलेले असतात.

खडकाळ दगडांचा तो पसारा उघडा असतो. त्यावर मातीचा थर अल्प म्हणजे बोटभर अर्थात काही मिलिमीटर ते तीस सेंटिमीटर इतका असू शकतो. त्यावर कोणतीही झाडी  जास्त काळ कायमस्वरूपी तगून राहत नाही. एखादे चिवट झुडूप फटीमधून जगतेही, पण फार तर मीटरभर वाढते. काही वेळा थोडीशी माती खडकात घळीतसाठते. ती माती बारीक वाळूसारखी असते. उन्हाळ्यात तापमान जास्त, आर्द्रता कमीतर पावसाळ्यात जुलै ते सप्टेंबर भरपूर पाऊस  आणि आर्द्रता जास्त असते. त्या काळात तेथे पाण्याची डबकी, तळी साठतात, जलमय भूमी निर्माण होते. विविध वनस्पती तेथे फुलतात, बहरतात. त्यांचे आयुष्य पावसाळ्यापुरते मर्यादित असते. शुष्क, तपकिरी, निर्जीव वाटणारे सडे, खडकाळ भूमी विविध आकार, प्रकार,रंग, रूप, रस, गंध असलेल्या फुलांनी भरभरून फुलतात. ठरावीक कालक्रमाने वेगवेगळ्या वनस्पतींचे प्रकार एकापाठोपाठ एक फुलतात. कीटक, भुंगे, मधमाशा, पक्षी यांची अलोट गर्दी  सड्यांवर होते. इथला मध, रानमेवा ज्या त्या ऋतूला अनेकांना रोजगार देऊन जातो. करवंदे, जांभळे, नेर्ली, तोरण, बोबलं, अळू हे खाद्य प्राणी, पक्षी, कीटक आणि मानवाला देखील उपयोगी पडले आहे पडणार आहे. तसेच पश्चिम घाटातील हजारो औषधी वनस्पती अनेकांच्या जीव वाचवायला उपयोगी पडताहेत.

इथली जैवविविधता व मानवी संस्कृती याचा धांडोळा घेतला तर प्रत्येक  संस्कृतीत निसर्गाचा पुरेपूर वापर अन्न, वस्त्र व निवारा अशा सुखसोईसाठी करताना झालेले दिसेल. लोकसंख्या वाढली तशी मानवी हावही वाढली, वापरापेक्षा साठविण्याकडे माणसांचा कल दिसून येऊ लागला. प्राणी, वनस्पती, औषधासाठी त्याचे व्यापारीकरण इतके झाले की एखाद्या ठिकाणाहून त्या कायमच्या दिसेनाशा  झाल्या. नरक्या, बिब्बा आणि शतावरी सारख्या कोणत्याही जंगलात सहज दिसणाऱ्या वनस्पती आता औषधालाही मिळणे दुरापास्त झाले आहे. जिभेच्या चोचल्यासाठी अनेक प्राणी व पक्षी दुर्मिळ झाले. तर टणटणी, बेशरम, ग्लारीसेडीया, पाम अन निलगिरची  विविधता वाढली आहे. मात्र त्याच्यावर कोणतेही प्राणी, पक्षी सोडा साध्या मुंग्या आणि कीटक येत नाहीत.

काही सड्यांवर स्थळविशिष्ट वनस्पतींची संख्या बरीच आहे. त्या वनस्पतींत विविधता आहे कीटक, प्राणी यांचीही संख्या मुबलक आहे. पाणी अल्पकाळ असले तरी त्यात बेडूक, स्थानिक मासे असतात, सरिसृप, वटवाघळे आणि पक्षी यांचेही वेगवेगळे प्रकार असतात. माकडे, ससे, रानडुक्कर, सायाळ, हरणे, गवे, रेडे आणि बिबटे यांचाही वावर तेथे असतो. स्थानिक लोकांची गुरेढोरे तेथे चरतात. देवराया स्थानिक मंदिरे त्या पठारावर असतात. त्यांचे सण त्या पठारावर नित्याने साजरे होतात.

वन्यजीव रक्षण ही माझी जबाबदारी आहे. याचे भान ठेवले पाहिजे वन्यजीवांबद्दल भीति संपून आदर निर्माण व्हावा ही अपेक्षा असते. भावी पिढीला नुसत्या चित्रातून पूर्वी भारतात हे प्राणी होते, डोंगर दर्यात विविध पक्षी, तर गावगावात साप दिसत होते असे सांगावे लागेल. आता असे पेंढा भरलेले प्राणी, पक्षी प्रयोग शाळेत वा म्युझिअममध्ये ठेवायला परवानगी

नाही. तसेच आता सर्कशी मध्येही जंगली प्राण्यांच्या खेळावर बंदी आहे. वन्यजीव आता का दिसत नाहीत हे कोणत्या तोंडाने आपण पुढल्या पिढीला सांगणार आहात?

जंगलातून अभयारण्यातून मुक्तपणे फिरणारे जीव मध्यंतरी लॉकडाऊनच्या काळात गावापर्यंत पोहचले होते. लोक सहभाग असेल तर अनेक बाबी तशाच जिवंत ठेवता येतात. आपण दैनंदिन जीवनात अनेक कृती करतो त्याचा थेट अथवा आडमार्गाने वन्य जीवांशी संबंध येत असतो. आपण वापरत असलेली वीज तयार होताना वापरलेले पाणी ज्या धरणातून आलेले आहे तेथे पूर्वी जंगले होती. त्यात कित्येक वन्यजीव गुण्यागोविंदाने रहात होते. त्यातले कांही अत्यंत दुर्मिळहोते. लोखंड, कोळसा आणि बॉक्साईटच्या खाणीतून आपण आपल्या दैनंदिन गरजा भागवल्या. त्यासाठी रस्ते करताना आणि खाणी खणताना मात्र कित्येक पशुपक्षांच्या राहत्या जागा, त्यांच्या शिकारीच्या जागा आम्ही संपवल्या. आमच्या कांही पिढयांनी शिकारीचा सार्वजनिक खेळ खेळून प्राण्यांची संख्या कमी केली. मानवाच्या जीभेचे चोचले पुरविण्यासाठी अनेक वन्य प्राण्यांना व आसपासच्या पक्षांना आपला जीव गमवावा लागला आहे.

शिक्षित मानवाला अभयारण्यांचे महत्व, जंगलाचे औदार्य कळेना, पूर्वजांनी गावाजवळ राखलेल्या देवरायांचे देणेही त्याला कळेना. वणव्यासारख्या गोष्टी लावणे सोपे पण विझवणे अवघड असते हे आजही त्याला कळेनास झाले आहे. परिणामी शेतात व गावाजवळ असे वणवाग्रस्त प्राणी अन्नपाण्याच्या शोधात येतात. तेथेच मानव व वन्यजीवांच्या संघर्षाला सुरुवात हाते त्यात दोघांपैकी कोणा एकाचा मृत्यू ठरलेलाच असतो.



वन्यजीवांच्या रक्षणासाठी खालील बाबी स्थानिक पातळीवर पश्चिम घाटात राहणाऱ्या आपण सर्वांनी करुया. एकाच प्रकारचे वृक्ष लावून तयार झालेल्या जंगलात जैवविविधता येणार नाही. त्या जंगलात जैवविविधता आणूया. वन्यजीवांची शिकार टाळूया, त्यांच्या अवयवापासून तयार केलेल्या कोणत्याही वस्तूंच्या खरेदीविक्रीत सहभाग घेणार नाही. त्या बाबी पूजणार देखील नाही. माझी संपत्ती वाढेल म्हणून गैरसमजुती पोटी कोणत्याही प्राण्यांची, पक्षाची हत्या मी करणार नाही आणि अशा अंधश्रद्ध कल्पनांना खतपाणी घालणार नाही.

त्याचबरोबर परिसरातील वन्यजीव सुरक्षित राहून त्यांची अन्नसाखळी अबाधित कशी राहील यासाठी प्रयत्न करेन. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ समजावुन घेवून. आपल्या आसपास वन्यजीवांची हत्या होत असल्यास. तसेच साप, सर्पविषाची, वटवाघळांची, धनेश पक्षांची, घुबडांची, कासवांची किंवा वन्यप्राण्यांच्या कातडयाची, शिंगांची, अवयवांची, प्राण्यांच्या नखांची, हस्तीदंताची अथवा कोणत्याही प्रकारच्या वन्यजीवांची तस्करी होत असल्यास जवळच्या पर्यावरण प्रेमींना, पोलिसांना, पत्रकारांना आणि जवळच्या वन कर्मचारी व वन अधिकारी यांना

कळवेन. त्याबाबत जागरुकता निर्माण करेन. जसा भारतीय चित्ता कायमचा नष्ट झाला आणि आता दुसऱ्या देशातून आणावा लागला. तशी आता गिधाडे, अस्वलं, कस्तुरीमृग, माळढोक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. वाघांची, सिहांची, रानटी गाढवांची संख्या वर्षागणिक कमी कमी होत आहे याची खंत आपल्या मनात निर्माण व्हावी. यासाठी वन्यजीव संरक्षण चळवळीत आपण सहभागी व्हाल ही अपेक्षा. निसर्ग अनेकदा जागोजागी थोड्याफार दुरुस्त्या करू शकतो.मात्र मोठ्या दुरुस्त्या तो करीत नाही. आपण जर साध्या राहणीत राहणार असू तर हा निसर्ग साथ देईल अन्यथा 'तुझाच वेड्या शेवट आहे माझ्या पायाशी,' हे निसर्ग तत्व आहे. आपण जैवविविधता जपण्यासाठी आणि संवर्धन करण्यासाठी स्थानिक पातळीवर सुरुवात करूया. पर्यावरण दिनानिमित्त एवढे खरे की आपल्या सर्व  समस्यांची उत्तरे निसर्गातच आहेत. आपण इतर सजीवांबरोबर जेथे राहतो तो सर्वांचा अभिमान असणारा  पश्चिम घाट अबाधित ठेऊया.

वणवे लावण्याबाबत बंदोबस्त गावपातळीवर, वनविभागाच्या बीट पातळीवर झाला पाहिजे.

वणवे विझविणाऱ्या टोळया गावागावात झाल्यास वन वणवे व डोंगरांना लागणाऱ्या. आगी थांबवता येतील त्या परीसरातील जैवविविधता टिकविता येईल.

स्थानिक पातळीवर स्थानिक लोकांच्या सहाय्याने आहेत त्या वन व्यवस्थापन समित्या आणखी थोडया कार्यरत करुन त्यात युवकांचा सहभाग वाढविला पाहिजे.

स्थानिक लोकांनी आतापर्यंत जीवापाड जपलेली जैवविविधता गावाच्या आसपास आहे. कांही गावात जैवविविधता संपन्न देवराया गावकीच्या मालकीच्या आहेत. त्या जपणे टिकविणे गरजेचे आहे.

या देवराया जपल्या पाहिजेत कारण भारतातील या जैवविधतेच्या जनुकीय बँका आहेत. येथील जैवविविधता जगात इतरत्र कोठेच आढळत नाहीत.

आपल्याला पूर्वी गिधाडे, विविध  प्राणी, पक्षी, साप, विंचू आणि इतर कीटक दिसत असत पण आता ते



जीव दिसत नाहीत त्यामागची कारणे शोधली पाहिजेत.

कीटकनाशकांचा अतिवापर टाळूया, त्यामुळे सर्वच कीटकांची संख्या घटत असून दुसऱ्या कीटकांना खाऊन जगणाऱ्या, कीटकांनाही आपण मारुन टाकतो.

वायू प्रदूषण, जल प्रदूषण, मातीचे प्रदूषणाच्या विरोधी सतर्कता वाढविणे आपल्याच हातात आहे. त्यामुळे जैवविविधता टिकविण्यात यश येईल.

अनेक नागरिकांना वृक्ष संवर्धनात व संरक्षणात विशेष रस असतो. त्यात सातत्याने वाढ होणे गरजेचे आहे. कमी झाडे लावा पण ती जगवून दाखवा.

स्थानिक जातीची झाडे लावल्यास पक्षी, कीटक, फुलपाखरे, इतर प्राणी यांना खाद्य मिळेल त्यांची संख्या वाढेल.

आपल्या परिसरातील जैवविविधता नोंदपत्रक पर्यावरण प्रेमी गटाकडे असावे ते त्यांनी अद्ययावत ठेवावे. परिसरात किती प्रकारचे प्राणी, पक्षी, किटकांचे व वनस्पतींचे राज्य आहे ते समजेल.

याचा आढावा स्थानिकांच्या मदतीने घेऊन अशी नोंदपत्रके ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

जेष्ठ नागरिकांना यात माहितीची भर टाकता येईल.

वाहनाखाली अनेक प्राणी मरतात आपल्या वाहनाखाली एखादा प्राणीपक्षी मरणार नाही याची दक्षता घेउुया.

कागदाच्या अतिवापराने, टिशू पेपर, नॅपकिन्सच्या अट्टाहासाने वापर कमी करूया, तसेच फटाक्यांचा, कृत्रिम रंगाचा अतिवापराने इथे प्रचंड बदल दिसून येतात ते टाळूया .

थर्माकोल, सिंगलयुज प्लास्टीक, इलेक्ट्रॉनिक कचरा कारणाशिवाय अती वापरला जातो तसेच त्यांची कोठेही फेकाफेकी होत असते. ती जाणीवपूर्वक टाळूया .

कमी वीज वापरणे,गरजेपुरते पाणी वापरणे, सांडपाणी आणि कचरा कमी निर्माण करुन पर्यावरण संतुलनात सहभागी आपण होऊन योगदान द्यावे लागेल.

कमी इंधनावर चालणाऱ्या निर्धुर चुली, पेट्रोल, डिझेल ,गॅस दररोज थोडा थोडा कमी वापरुन जैवविविधता टिकवण्यासाठी स्वत:हून प्रयत्न व प्रयोग केले पाहिजेत

वाघाच्या नख्या, हाडं, मांस व कातडीसाठी, हत्तीची हस्ती दंतासाठी, गेंड्याची त्याच्या शिंगासाठी, काळवीट हरणे यांची कातडी वा शिंगासाठी, पक्षांच्या पिसा व मांसासाठी, सापाच्या कातडी वा विषासाठी हत्या होते ती थांबविण्यासाठी कृती करावी लागेल.

घुबडं, कासव यांची हत्या गुप्तधनासाठी केली जाते. अंधश्रद्धेसाठी खवलेमांजर, साळिंदर यासारखे अनेक प्राणी पृथ्वीतलावावरुन संपविले जातात. अशा प्राण्यांची शिकार वा तस्करी केली जाते ते थांबवणे गरजेचे आहे.

आयुर्वेदिक औषधांच्या निर्मीतीसाठी नरक्या, शतावरी, सर्पगंधा इत्यादिंची प्रचंड मागणी वाढल्याने सरसकट या वनस्पतीची तोड होऊ लागली आहे.

आपण सर्वजण कृतीतून या गोष्टी करुया. पुढच्या वर्षी पुन्हा पर्यावरण दिन साजरा होणारच आहे. तेंव्हा जैवविविधतेला व पर्यावरणाला धोक्यात आणणाऱ्या व आपल्यामधल्या प्रवृत्तीला संपवायचे कसे हे तुम्हीच ठरवा. स्थानिक चौकस नागरिकांना हे सारे समजून येते त्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवरच पण स्वत:पासून कृतीला सातत्यपूर्ण सुरुवात केली पाहिजे. पुढील पिढीसाठी जैवविविधता संपन्न पर्यावरण आबाधित ठेवणे हाच पर्यावरण रक्षणाचा संदेश.

◆

**डॉ.सुधीर कुंभार**
मो. ९४२१२१४१३६